महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ७२ वे | दिनांक : ०५/०३/२०२६ | वार : गुरूवार

## राज्यसभेसाठी मविआतर्फे शरद पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब



**मुंबई :** राज्यसभेच्या आगामी निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतर्फे शरद पवार यांच्या उमेदवारीवर अखेर शिक्कामोर्तब करण्यात आले असून, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषदेद्वारे ही अधिकृत घोषणा केली आहे. शिवसेना नेते संजय राऊत यांनीही सोशल मीडियाद्वारे महाविकास आघाडीच्या एकजुटीचा पुनरुच्चार करत या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे. विशेष म्हणजे, शरद पवार उद्या स्वतः अर्ज भरण्यासाठी विधानमंडळात जाण्याची शक्यता कमी असून, निवडणूक अधिकारी त्यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी जाऊन अर्जाची प्रक्रिया पूर्ण करणार असल्याची माहिती समोर आली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना सुप्रिया सुळे यांनी सुरुवातीला काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाचे आभार व्यक्त केले. सुळे म्हणाल्या, कालच जयंत पाटील आणि मी उद्धव साहेब यांची भेट घेतली. त्यानंतर आज काँग्रेस पक्षाने देखील मोठ्या मनाने शरद पवार साहेबांना ही संधी दिली त्यासाठी आम्ही आभारी आहोत. अनेक वर्ष आम्ही एकत्र काम करत आहोत. महाराष्ट्रात जेव्हा आव्हान येतात तेव्हा आम्ही महाराष्ट्राच्या हितासाठी आणि देशाच्या हितासाठी एकत्र लढत असतो.

या पत्रकार परिषदेत काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ तसेच विजय वडेट्टीवार देखील उपस्थित होते. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, राज्यसभा ही आम्हाला मिळावी अशी इच्छा आम्ही व्यक्त केली होती. मात्र 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' ही देखील भूमिका काँग्रेस पक्षाची होती. शरद पवार यांच्या सारखे नेतृत्व आणि त्यांचा जो अधिकार आहे, त्यानुसार सविस्तर स्वरूपात काँग्रेसच्या सर्व नेत्यांसोबत आम्ही चर्चा केली. राहुल गांधी यांच्यासोबत देखील चर्चा झाली. त्यानंतर आमचे प्रभारी आणि जीएसओ यांच्यासोबत चर्चा झाली आणि काँग्रेस पक्षाने शरद पवार साहेबांना पाठिंबा जाहीर केला.

दरम्यान, शरद पवार यांच्या प्रकृती अस्वस्थतेमुळे ते राज्यसभा उमेदवारीचा अर्ज भरण्यासाठी प्रत्यक्ष विधानमंडळात उपस्थित राहू शकणार नाहीत. या पार्श्वभूमीवर, विधिमंडळाचे अधिकारी उद्या त्यांच्या 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानी जाऊन अर्ज दाखल करण्याची रीतसर प्रक्रिया पूर्ण करतील आणि त्यांना गोपनीयतेची शपथ देतील, अशी विश्वसनीय माहिती सूत्रांनी दिली आहे.

## दुबईतून १११ नागरिक पुण्यात सुखरूप परतले




**पुणे :** मध्यपूर्व आणि आसपासच्या देशांमधील तणावपूर्ण प्रादेशिक परिस्थितीमुळे दुबईत अडकलेल्या पुण्यातील १८४ नागरिकांपैकी १११ नागरिक सुखरूप पुण्यात परतले आहेत. उर्वरित ११ नागरिकांच्या विमान उड्डाणाची वेळ बदलण्यात आली असून, ५४ नागरिकांना परत आणण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, परदेशात वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण सूचना जारी करण्यात आल्या आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांनी आवश्यक माहितीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पॅलेस्टाईन (रामल्लाह), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), इस्त्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), इराक (बगदाद), कुवेत, बहारीन, मस्कत, जॉर्डन आणि संयुक्त अरब अमिरात (अबूधाबी) येथे राहणाऱ्या सर्व भारतीय नागरिकांनी अत्यंत सतर्क राहावे. त्यांनी अनावश्यक हालचाली टाळाव्यात आणि स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शासनाने वेळोवेळी केले आहे.

आपत्कालीन परिस्थितीत संबंधित देशांतील भारतीय दूतावासांच्या २४x७ हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. दूतावासांकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.

परदेशात वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांनी शांतता व संयम राखावा, अधिकृत माहितीकडेच लक्ष द्यावे आणि आवश्यक असल्यास तात्काळ भारतीय दूतावासांशी संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र शासनाने केले आहे. केंद्र सरकार आणि संबंधित दूतावासांशी समन्वय साधून, महाराष्ट्र शासनाच्या वतीने नागरिकांच्या सुरक्षेबाबत सतर्कता बाळगली जात आहे.

## संभाजीनगरच्या ऐतिहासिक बौद्ध लेणी परिसरात अवैध उत्खनन : विजय वडेट्टीवार विधानसभेत आक्रमक, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**छत्रपती संभाजीनगर :** येथील ऐतिहासिक बौद्ध लेणी आणि संरक्षित गुंफा परिसरात भू-माफियांकडून सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खननाचा मुद्दा आज विधानसभेत काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे उपस्थित केला. बुद्ध लेणी बचाव कृती समितीच्या आंदोलनाची दखल घेत, या तस्करीला जबाबदार असलेल्या महसूल अधिकाऱ्यांवर आणि भू-माफियांवर कठोर कारवाई करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली.

छत्रपती संभाजीनगर येथील पहाडसिंगपुरा परिसरातील प्राचीन बौद्ध लेणी आणि हरसूल तलावापर्यंतच्या गायरान जमिनीवर अहोरात्र मोठ्या यंत्रांच्या सहाय्याने मुरुम, माती यांचे अवैध उत्खनन सुरू आहे. यामुळे पुरातत्त्वदृष्ट्या संवेदनशील असलेल्या टेकड्यांना आणि लेणींच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. मागील एक वर्षापासून जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी वेंकटेश राठोड, अपर तहसीलदार उमेश पाटील आणि नायब तहसीलदार परेश चौधरी यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही गौण खनिज उत्खनन थांबलेले नाही, अशी माहिती औचित्याच्या माध्यमातून वडेट्टीवार यांनी विधानसभेत मांडली.

महसूल प्रशासनाकडून केवळ नोटिसा देण्याचे सोपस्कार पार पाडले जातात, परंतु प्रत्यक्षात कोणतीही दंडात्मक वसुली किंवा ठोस कारवाई केली जात नाही. रॉयल्टी चोरी आणि दंडात्मक कारवाईबाबत प्रशासन जाणीवपूर्वक दिरंगाई करत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

केवळ लेणी परिसरच नव्हे, तर गोदावरी नदी पात्रातून होणाऱ्या अवैध रेती उत्खननाबाबतही जिल्हा प्रशासनाविरुद्ध तक्रारींचा ओघ सुरू आहे.अवैध उत्खनन करणाऱ्या भू-माफियांवर तात्काळ गुन्हे दाखल करून दंडात्मक कारवाई करावी, तक्रारींची दखल न घेणाऱ्या आणि माफियांना छुप्या पद्धतीने मदत करणाऱ्या संबंधित महसूल अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यकाळात किती वाहनांवर कारवाई केली आणि किती दंड प्रत्यक्ष वसूल केला, याचा अहवाल सादर करावा अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ मार्च २०२६


## जिंतूर तालुक्यातील शाळेत पर्यावरणयुक्त होळी साजरी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केहाळ तांडा येथे, पर्यावरण पूरक होळी साजरी करण्यात आली.शाळेच्या परिसरातील व गावातील कचरा जमा करून त्याची होळी करण्यात आली.विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्ती,अंधश्रध्दा,अनिष्ट रूढीचे दहन करण्याचा गावकऱ्यांना संदेश दिला. विद्यार्थ्यांसमवेत गावकऱ्यांनी सुद्धा हा कचरा गोळा करण्यासाठी हातभार लावला. होलिका दहन करणे मागचे उद्देश मुलांना सांगण्यात आले. गावातील ज्येष्ठ नागरिकांकडून होळीचे पूजन करून होळी पेटविण्यात आली. यानंतर मुलांनी पर्यावरणयुक्त नैसर्गिक रंग खेळून व बंजारा नृत्य करून धुलीवंदन हा सण साजरा केला. याप्रसंगी गावातील नवयुवक, जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या होळी व धुलीवंदन साठी शाळेतील शिक्षक श्री तुकाराम काळे, निखिल अन्नदाते, पांडुरंग उघडे, श्री वाकुडे आदी शिक्षकांनी पुढाकार घेतला.

## जय हो फाऊंडेशनतर्फे व्यंकटेश बालसदनच्या अनाथ विद्यार्थ्यांसोबत आनंदात होळी साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** जय हो फाऊंडेशन छत्रपति संभाजीनगर तर्फे श्री व्यंकटेश बालसदन च्या अनाथ विद्यार्थ्यांन सोबत होळी साजरी करण्यात आली. याप्रसंगी जय हो फाऊंडेशन अध्यक्ष श्री पंकज भाऊ मोदी तसेच श्री महेन्द्र पाटील, श्री खैरे सर, श्री व्यंकटेश बालसदनचे अधिक्षक श्री देशमुख सर व श्री धनवे सर, श्री गणेशभाऊ कुमावत, चिमुकल्याच्या चेहऱ्यावर स्मित हास्य व आनंद निर्माण करण्याचा छोटासा प्रयत्न तसेच ग्रुप तर्फे मुलांना नाष्टा देण्यात आला.

## पत्रकारिता : पगाराविना परमार्थाचा अखंड प्रवास

पत्रकार आणि समाज सेवकांना केवळ लष्कराच्या भाकऱ्या भाजणे असे म्हटले जाते. ते सत्य जरी असलं तरी लोकशाहीचा चौथा मजबूत खांब म्हणून पत्रकारितेकडे पाहिलं जातं आणि ते सत्य आहे.समाजाचे प्रश्न उचलणे, न्याय मिळविण्यासाठी प्रयत्न करणे. उपेक्षितांचा आवाज बुलंद करणे. नाहीरे साठी संघर्ष करणे. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय लोकशाहीने घालून दिलेले मूल्य घेऊन सातत्याने कार्य करत राहणे. मानधन नाही. पगार नाही. सुरक्षितता नाही. तरीही आपलं कार्य कायमस्वरूपी निरंतर चालू आहे.समाज कदाचित कौतुक करणार नाही. परंतु समाजातल्या प्रत्येक माणसांमध्ये आपल्याबद्दल आपुलकी असतेच,प्रश्नच नाही. परंतु तुकाराम महाराजांनी सांगितलेल्या विचाराप्रमाणे प्रपंच करून परमार्थ करावा. पत्रकार म्हणून विचार केला तर प्रपंच खूप कमी पण परमार्थ नियमित चालू असतो.म्हणूनअनेक पत्रकारांची कौटुंबिक विवेचना झाल्याचे दिसते. खर तर देशभर पत्रकारांच्या आर्थिक बाजू मजबूत करने.त्यांना संरक्षण देणे.त्यांचा सन्मान करणे. त्यांच्या विशेष इन्शुरन्सची व्यवस्था करणे.याकडे सरकारचं विशेष लक्ष नाही.ते वेधण्यासाठी सुद्धा आपल्याला भविष्य काळामध्ये काम करावे लागेल. एकविसावं शतक ओलांडताना या धावपळीच्या चढ उतरच्या कार्यकालामध्ये आपण पत्रकारिता हाताळत आहात. चांगलं कार्य करत आहात. याचा आम्हास अभिमान वाटतो.. आज दोन ओळीचे पत्र लिहावाच वाटलं.आणि सोबत महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवन कार्यावरती प्रकाश टाकणारे गीत सुद्धा पाठवावं वाटलं.

**- भूमीपुत्र वाघ**

## “लेखकांनी संविधानवादी आव्हाने स्वीकारली तरच साहित्यातून संविधान व समताधिष्ठीत माणूस दिसेल” - डॉ. दैवत सावंत



**छत्रपती संभाजीनगर :** "साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब म्हणतांना समाजातील सरंजामीवृत्ती , एकाधिकारशाही,राष्ट्र निष्ठेपेक्षा व्यक्तिनिष्ठा , व्यक्तिपुजेचे स्तोम भारी पडल्यामुळे लेखक साहित्यिक वास्तवाचा सामना करू शकत नाहीत.असे दुर्बल लेखक कोणत्या लेखनास न्याय देतील ? लेखकांनी संविधानवादी आव्हाने स्वीकारली तरच साहित्यातून संविधान व समताधिष्ठीत माणूस दिसेल.-" असे विचार प्रा. डॉ. दैवत सावंत यांनी स्पष्ट केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय IQAC आणि शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर मराठी विभाग आयोजित डॉ. अनंत राऊत यांच्या "संविधानवादी साहित्य सिद्धांत आणि दिशा" या ग्रंथावरील चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी डॉ.नामदेव गपाटे (बनारस हिंदू विद्यापीठ) यांनी परंपरागत साहित्य समीक्षा यांचा मूल्यात्मक आढावा घेत साहित्य व संविधान त्यातील मूल्ये आणि त्यांची समीक्षा या हेतुने मराठीतील कथा,कविता,नाटक, चरित्र या अनुषंगाने चर्चा केली .सदर चर्चासत्रात आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे संचालक डॉ.आनंद वाघ, संविधान अभ्यासक संशोधक डॉ.ह. नि. सोनकांबळे , प्रा डॉ. सविता वावगे यांनी संविधान व भारतीय साहित्य परंपरा मूल्यव्यवस्था, भारतीयती समाज व्यवस्था अधोरेखित करत संविधानवादी साहित्य आणि अनंत राऊत यांच्या भूमिकेवर मतमतांतरे स्पष्ट केली. प्रारंभी ग्रंथावरील चर्चासत्रात,चर्चासत्रामागील भूमिका प्रास्ताविकात प्रा डॉ.नवनाथ गोरे यांनी मांडली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.आर.व्ही. मस्के यांनी संविधान हा आमच्या जगण्याची परंपरा झाला पाहिजे,आमच्या श्रद्धा , परंपरा व आस्था संविधान केंद्रीत झाल्या पाहिजेत जाती धर्मापेक्षा समाजाच्या अंतर्मनात राष्ट्रवाद व संविधानमूल्ये रूजली , झिरपली तरच संविधानवादी साहित्य व समीक्षेला अर्थ प्राप्त होईल असे सांगितले. या कार्यक्रमासाठी विभाग प्रमुख डॉ. एकनाथ फुटाने, डॉ.बी.एन.शिंदे, डॉ. राजीव वाघमारे, डॉ.अशोक केवटे,डॉ. महेश आकुलवार,डॉ.पूजा वडमारे, डॉ. गणेश खिल्लारे, डॉ. गौतम घाडगे ,अधिक्षक राजू पट्टेकर,डॉ.वरशीळ रामेश्वर,डॉ. संदिप गवई यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समाधान सातव यांनी केले,तर आभार उपप्राचार्य प्रा.एन.एम.करडे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक कर्मचारी इतर प्राध्यापक, अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ मार्च २०२६

# सोमेश्वर संकुलात गुणवंतांचा सन्मान












**घाटनांदुर :** गुणवत्तेसह बहुजणांचे ज्ञानपीठ अमृतमहोत्सवी सोमेश्वर शैक्षणिक संकुलात एनएमएमएस शिष्यवृत्तीत विक्रम घडवणाऱ्या छपन्न गुणवंतांचा पालकांसह सहदय सत्कार करण्यात आला.यावेळी क्रांतीज्योती सावित्रीमाईच्या प्रतिमेस अभिवादन आणि मंचावरील मान्यवरांचा सत्कार करुन संस्थाध्यक्ष डॉ.उध्दवराव शिंदे, संस्थासचिव अजितदादा देशमुख व UPSC यशवंत IPS ऋषिकेश शिंदेसाहेब यांच्या हस्ते गुणवंतासह पालकांना पेढा भरवुन, पुस्तक व पुष्पगुच्छ देवुन सन्मानीत करण्यात आले. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांतील गुणवंतासाठी केंद्र सरकारकडुन NMMS परीक्षेचे आयोजन करण्यात येते. सोमेश्वरच्या गुणवंतांना २०२३ मध्ये पाच लाख बावन्न हजार रुपये, २०२४ मध्ये नऊ लाख रुपये, २०२५ मध्ये चौदा लाख रुपये स्कॉलरशिप मिळाली होती तर एक मार्च २०२५ पासुन परीक्षेपर्यंत घेतलेल्या जादा तासिका, आयोजित केलेले सेमिनार्स व डाऊटसेशन्स आणि झालेल्या दोनशे पन्नास सराव परीक्षा यामुळे २०२६ मध्ये सोमेश्वर शैक्षणिक संकुलातील कन्या-३१ व बॉईज-२५ असे एकुण-५६ गुणवंत NMMS परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. NMMS गुणवत्ता यादीतील धारक विद्यार्थी किमान पंधरा लाख रुपयांच्या शिष्यवृत्तीचे मानकरी ठरणार असल्याने घाटनांदूर परिसरातील शैक्षणिक क्षेत्रात पुन्हा नवा ऐतिहासिक महाविक्रम स्थापित होत आहे. याप्रसंगी IPS ऋषिकेश शिंदे साहेब यांनी केंद्रीय लोकसेवेचा प्रवास, समाजव्यवस्था, वेगळी ओळख निर्माण करा पण चुकीची ओळख नको वेगाने बदलणाऱ्या, सोशल मिडीयातील अफवांवर विश्वास ठेवु नका, दबावाखाली नको तर आवडीच्या क्षेत्रात करियर करा आणि पालकांनी विद्यार्थ्यांनी जात-धर्माऐवजी माणुसकी धर्म शिकवा इत्यादी विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले तर डॉ.उध्दवराव शिंदे यांनी अभ्यासपुर्ण अध्यक्षीय समारोप केला. विशेष म्हणजे पास प्रमाणात सोमेश्वर शैक्षणिक संकुलाचा जिल्ह्यात तीसरा क्रमांक आला असल्याने शिक्षणप्रेमींना आनंद व्यक्त केला आहे. दर्जेदार शिक्षण, सहशालेय उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता आणि स्कॉलरशिपमध्ये नेत्रदिपक, लक्षवेधी व दिमाखदार कामगिरी करण्यासाठी सोमेश्वरसारथी बांधिल आहेत. याप्रसंगी कठोर परिश्रम घेणाऱ्या अभ्यासु व तज्ञ मार्गदर्शक शिक्षकांचा सुध्दा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळयास प्राचार्य दि.ना.फड सर, मुख्याध्यापिका श्रीमती एस.के.जाधव मॅडम, पर्यवेक्षक कृष्णा देशमुख सर, पत्रकार गणेश जाधव, पालक, शिक्षक, विद्यार्थी व घाटनांदूर परिसरातील शिक्षणप्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार सोहळयाचे प्रास्ताविक श्रीमती एस.जी.लोखंडे मॅडम तर शैलिदार सुत्रसंचलन व आभार श्रीमती एस.एल.देशमुख मॅडम व श्रीमती एस.बी.पारेकर मॅडम यांनी व्यक्त केले...

# शारेना खानम यांच्या जीवनातील पहिला रोजा पुर्ण



**जिंतुर (बी. डी. रामपूरकर) :** शहरातील पठाण मोहल्ला परिसरातील रहवाशी व किंग फ्लाऊड अँड डोर चे व्यापारी शाहेदखान पठाण यांची सात वर्षीय मुलगी शारेना खानम या चिमुकलीने पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधुन दि ०२ मार्च सोमवार रोजी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पुर्ण केला. रमजान महिन्यातील रोजाला मुस्लिम बांधवामध्ये खुप महत्त्व असून या महिन्यात मुस्लिम बांधव सलग ३० दिवस रोजा ठेवून विविध धार्मिक विधीद्वारे अल्लाहची पुर्ण श्रध्देने आराधना करतात आणि याच महिन्यात तपत्या उन्हात चिमुकलीनी आपल्या जीवनातील रोजाची सुरुवात केली आहे या पवित्र रमजान महिन्यात शारेना खानम या चिमुकलीने तपत्या उन्हाची पर्वा न करता आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीपणे पूर्ण केल्याने फुलहार देऊन सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले यावप्रसंगी वडील शाहेदखान, आई जिनत खानम, काका आवेस खान, परवेजखान, अजी, गुलनाज बेगम, नाना शेख आलम, नानी नसरीन बेगम, मामा शेख अरशद, शेख अशर भाऊ हमजाखान, अनसखान, अब्दुल राफेखान यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे कौतुक करुन अभिनंदन केले.

# जागतिक महिला दिनानिमित्त कविता लेखन स्पर्धेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** ध्यास गझल समूह, टेरेसवरील कविता समूह तर्फे जागतिक महिला दिनानिमित्त कविता लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा केवळ महिलांसाठी असून वयाचे आणि विषयाचे बंधन नाही. विजेत्यांना सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ आणि दर्जेदार काव्यसंग्रह भेट दिला जाईल. आलेल्या कवितांमधून प्रथम ५ विजेते घोषित करण्यात येतील. विद्यार्थिनी व बाल कवयित्रीस दोन विशेष बक्षिसे देण्यात येतील. स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी प्रवेश शुल्क १०० आकारण्यात आले आहे. कविता मो. क्रमांक ९४२३७७९५५३ वर पाठवावी. प्रवेश शुल्क ८३८०९७२५१८ ह्या क्रमांकावर दिनांक ७ मार्च पर्यंत पाठवावे. छत्रपती संभाजी नगर येथे एका विशेष सोहळ्यात विजेत्यांना बक्षीस वितरण केले जाईल. विजेत्यांना कविता सादरीकरण करण्यासाठी संधी दिली जाईल. तरी जास्तीत जास्त कवयित्रींनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन मृणाल देशपांडे, संध्या फुलपगार, रूपाली पाटील, कल्याणी कोळपकर, कवी गिरीश जोशी ह्यांनी केले आहे.




बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ मार्च २०२६


## माय मायेची सावली

प्रत्येकाच्या घरोघरी,
माय मायेची सावली.
सुख दुःखामध्ये तीच,
सदा सर्वदा धावली. १

दुःख सोसूनी वाटते,
सदा कुटुंबात सुख.
संकटांशी लढतांना,
सदा पळविते दुःख. २

अशी कशी माय तुझी,
जगण्याची रीत आहे.
दुःख भोगता भोगता,
संसारात सुख पाहे. ३

धडपड तिची चाले,
कुटुंबाच्या सुखासाठी.
माय पुढे चालणार,
संकटात मुलांसाठी. ४

कल्पवृक्ष आहे घरी,
माय मायेची सावली.
प्रत्येकाच्या संकटात,
माय सतत पावली. ५

कसे फेडू उपकार ?
माय मला तूच सांग.
सात जीवनात तुझे,
फिटणार नाही पांग. ६

चला चला सारेजण
माथी लावूया चंदन
राबणाऱ्या ममतेला
आज करूया वंदन. ७



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**



**दौलताबाद (जावेद अहमद) :** वयाच्या सातव्या वर्षी श्रद्धेचा पहिला टप्पा पूर्ण केलेरतनजी मोहला दौलताबाद येथिल तसमिया अझहर शेख वय सात वर्षे हिने आपल्या जीवनातील पहिला रोजा उपवास पूर्ण केले आहे छोट्या रोजदार तिचे आजोबा, आजी ,आई वडील, मामा, आत्या, नातेवाईक यांनी तिचे कौतुक केले आहे

# व्हॉलीबॉल व थ्रोबॉल मध्ये 'बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाचा' संघ अजिंक्य




**जालना :** दि: २८ फेब्रुवारी ते १ मार्च पर्यंत गोल्डन जुबली स्कूल येथे झालेल्या 'महीको ग्रुप पुरुष हॉलीबॉल' व 'महिला थ्रो बॉल' संघाचे विजेतेपद बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाने पटकावले आहे. या स्पर्धेत कर्मचारी व विद्यार्थी दोन्हींचा समावेश होता. व्हॉलीबॉल संघात कर्णधार प्रा. अभिषेक ढेंबरे, उपकर्णधार, डॉ. कुणाल देशपांडे, डॉ. पवन देशमुख, हर्षवर्धन कोल्हे, प्रेम मेहामी, अभय पंगुडवाले, आकाश राम, शुभम शेंडगे, पवन जोगदंड व समाधान गायकवाड यांचा समावेश होता. थ्रो बॉल संघात कर्णधार वैष्णवी कांबळे, उपकर्णधार निकिता पारे, अंजली शिंदे, वैष्णवी मुळे, सुवर्णा सले, शारदा साहो, ऋतुजा ठाकूर, दिपाली रविदास, वैष्णवी मोरे व पायल वाघमारे यांचा समावेश होता. खेळाडूंच्या या यशाबद्दल डॉ. कविता प्राशर, प्र. प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, सिनेट सदस्य डॉ.भगवानसिंग डोभाळ, स्टाफ सेक्रेटरी डॉ. कालिदास सूर्यवंशी, क्रीडा मार्गदर्शक डॉ. भिकूलाल सले, क्रीडा समिती सदस्य डॉ. रवींद्र शिंपी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी भरभरून कौतुक केले.

# राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आसेगावच्या स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात



**दौलताबाद (जावेद अहमद) :** स्वामी विवेकानंद ग्लोबल स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज आसेगाव येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन, मातृ पितृ पुजन, मराठी राजभाषा दिन अशा विविध सांस्कृतिक, शैक्षणिक अशा विविध कार्यक्रमांचे आयोजित करण्यात आले होते. यावेळी आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून शाळेचे संचालक रत्नाकर फाळके , गीता फाळके, अध्यक्ष बाबासाहेब सोनटक्के तर पाहुणे म्हणून औरंगाबाद स्मार्ट शहर विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र जोगदंड, अभिनव इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक डॉ.विजय वाडकर होते . प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे वैज्ञानिक प्रयोग सादर केले होते , यांमध्ये चांद्रयान मोहीम प्रतिकृती, मानवी मेंदू, यकृत प्रतिकृती, विविध वैज्ञानिक प्रयोग सादर केले होते तसेच विद्यार्थ्यांनी माय मराठीचा गोडवा गाणाऱ्या गीतांवर नृत्ये सादर केली व विद्यार्थी पालक नातेसंबंध दृढ करण्यासाठी मातृ पितृ पुजनाचा कार्यक्रम देखील घेण्यात आला व भारतीय संस्कृती व संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजवली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक योगेश तंटक, नागेश लिंगायत, सत्यजित पवार,आदित्य घुगे, परमेश्वर उबाळे, सागर मुगले,शिक्षिका अनिसा शेख, नम्रता थोरात, वैशाली बोर्डे, आसमा पठाण, शोभा नागरे, अर्चना थळपती, सविता राजगुरू, सुनिता बहुरे, पुजा कावडे, सुनिता वायाळ, वर्षा काळवणे, ललिता कुलकर्णी, जयश्री मस्के, सोनम भागुंडे, सुनिता त्रिभुवन, प्रणिता जोशी, सुनिता सुर्यवंशी, ज्ञानेश्वरी देवचे, अश्विनी जाधव, रोहिणी पल्हाळ, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

प्रतिनिधी नेमणे आहे
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ मार्च २०२६


## रघुनाथपूरवाडी जिल्हा परिषद शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा



**वैजापूर** : राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने जि प प्रा शा रघुनाथपूरवाडी ,ता. वैजापूर या शाळेतील इयत्ता तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत अनेक प्रयोग सादर केले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन जेष्ठ नागरिक विष्णुपंत जाधव, सरपंच प्रेमसिंग घुनावत आणि आबा महाराज यांच्या हस्ते करण्यात आले .प्रदर्शनामध्ये सप्तरंगांची तबकडी, ज्वलनास ऑक्सिजनची मदत, हायड्रोलिक ट्रॉली, घरगुती कुलर, जादूने फुगणारा फुगा शास्त्रज्ञांची सचित्र माहिती इत्यादी अनेक प्रकारचे प्रयोग ,गणित आणि विज्ञानाचे मॉडेल्स श्लोक आत्माराम गायकवाड, ओमकार कालिदास गायकवाड, ओम काकासाहेब गायकवाड, दर्शन दीपक जाधव, हार्दिक गायकवाड, तुषार विष्णू जाधव, मयूर आगलावे, साई आगलावे, साई सूर्यवंशी, संकेत गायकवाड, करपुर देशमुख, श्रेयस काकरवल, संचित काकरवाल, आराध्या दीपक जाधव, केतन जाधव, शिवराज गायकवाड, अर्णव ढाले ,वेदांत ढाले या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थिनींनी आकृत्यांसह शास्त्रज्ञांची माहिती आणि प्रयोगांची माहिती संकलन केले. यानिमित्त रांगोळी रेखाटन आणि प्रसंगानुरूप फलक लेखनही विद्यार्थ्यांनी सुंदर रीतीने केले. टाकाऊतून टिकाऊ, दिखाऊ, विकाऊ आणि परिणामकारक विज्ञान प्रयोगाने विद्यार्थ्यांतील कृतीशीलतासह वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागण्यास निश्चितच मदत होणार आहे. मुख्याध्यापक साईनाथ कवार, संजय जाधव सर, जी बी पवार मॅडम ,बी आर जाधव सर आणि सूर्यकांत फडसर यांनी विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करत दुर्गम भागातील शाळेत सुंदर कार्यक्रम घडवून आणला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृता गायकवाड या विद्यार्थिनीने केले.

## गुलमोहर

रखरखत्या उन्हात
गुलमोहर बहरला
लाल केशरी रंग
निसर्गाने बहाल केला

गुलमोहर हा देखना
बागेला येई शोभा
आनंद देण्यासाठी
ताठ मानेनं उभा

उन्हाच्या कळा सोसूनही
देतो शितल छाया
निस्वार्थ सेवा देवूनी
सर्वांवर करतो माया

लाल केशरी छत्रीवानी
दुरून आपणास दिसतो
संकटाशी तोंड देवून
गुलमोहर सदा हसतो

पाच पाकळ्याचे फूल
आनंद देई मनाला
जगण्याची धडपड पाहून
येई उभारी जीवनाला




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## काल घर कोसळल्यावर

काल घर कोसळल्यावर
कळलं
भिंती नुसत्या मातीच्या होत्या
आणि
आज मी कोसळल्यावर
कळलं
नाती फक्त स्वार्थाची
तुझ्या पोटा इतकी सुरक्षा
जगात कुठच नव्हती
हे सांगताना सुध्दा
गहिवरून येतं
काल
तापत्या दुधावरची
साय काढतांना
अपसुकच भरुन
आलीत डोळे
साय आणि बायंनं
कधीच
कळू दिली नाही
तिच्या पोटातली धग
आज लिहिते झालो
म्हणून
माणसं वाचता येऊ लागली
खडा खडा
काल सहजच तिच्या
पायथ्याशी बसुन
म्हणालो
तुझ्या काळजाच्या
झडपेला
आहेत का तराजू
करतेस का मुल्य मापन
माझ्यात आणि त्याच्यात
तेंव्हा
तोंडातलं, डोळ्यावाटी
घळाघळा ओघळत ती
पाहत राहीली एक सारखं
तिला मिठी मारायची होती
मला
आणि
मी ही एकरुप
झाल्याच्या नोंदी
नोंदवत होतो
डोळ्यांच्या बुबळा भवती
आता ती पृथ्वी झाली
आणि
मी सुर्य
आमचे सात दशकांचे फेरे
सरता सरत नाही


**सुनील दादाराव उबाळे**
पैठणगेट औरंगाबाद
99701 21919


## श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालयात भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन




**उमरगा** : भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तथा भारतीय राष्ट्रीय युवक काँग्रेसचे धाराशिव जिल्हाध्यक्ष आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अधिसभा सदस्य मा. अश्लेष भैय्या शिवाजीराव मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त करिअर कट्टा आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या वतीने भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा गुरुवार, दि. ५ मार्च रोजी सकाळी १० वाजता श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथे होणार आहे.या रोजगार मेळाव्यात तब्बल ३५ उद्योजक व कंपन्यांचा सहभाग असून सुमारे ६५० रिक्त पदांसाठी थेट भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ८ वी, १० वी, १२ वी पास-नापास, आयटीआय, बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. तसेच डिप्लोमा व डिग्री इंजिनिअरिंग उत्तीर्ण उमेदवारांना या मेळाव्यात रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.उमरगा-लोहारा तालुक्यासह संपूर्ण धाराशिव जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. संजय अस्वले, प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. सूर्यकांत रावते तसेच अश्लेष भैय्या मोरे मित्र मंडळाचे अध्यक्ष आणि नगरसेवक व सभापती (स्वच्छता, आरोग्य व वैद्यकीय सेवा) मा. विशाल काणेकर यांनी केले आहे.

## होळी

आज आहे होळी
खाऊ पुरणपोळी

पळस फुलांचा रंग
त्यात सारे दंग

निळे, पिवळे रंग
बालगोपाळांचा संग

पिचकारीचा पाऊस
भिजण्याची हौस

ढोल-ताशांच्या नादात
नाचू सगळे रंगात

अशी आमची होळी
सुरू झाली सकाळी

सोहळा आनंदाचा
उत्सव गोड रंगांचा

करू साजरा सारे
आली आली होळी रे




**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**



प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ मार्च २०२६


# एक होता ढगुला : गमतीदार खुशखुशीत बालगोष्टी




"**म**नोरंजन करील जो मुलांचे,प्रभूशी नाते जडेल तयाचे"या श्रेध्देय साने गुरुजींच्या उक्तीप्रमाणे या बालकथा आहेत.कवी किरण भावसार सिन्नर यांचा हा बालकथासंग्रह.बाल मनावर गोष्टीची संस्कार शिदोरी पडली पाहिजे.मला वाचनाकडे वळाली पाहिजे.आज हे बाल विश्व हरवत चालले आहे.निर्सगाविषयी मुलांना काहीच माहितं नाही.कारण आजचा विद्यार्थी बालकं पालक त्याला या माय माती विषयी कशी माहिती देणारं कारण तो आपल्याच कामात व्यस्त आहे.मुलं मोठ्या माणसाचे अनुसरुन करतात.आज बऱ्याच घरात आजी आजोबा नाहीत.बालमनावर संस्कार पेरणारे हे बालकथेचे पुस्तक आहे.त्याच्या हाती पडलेतर खरोखरच आज मुलाला सोडून ऑफिसला जाणारी मम्मी पप्पा.जेंव्हा घरं घराच्या भिंती मुलांशी खेळतात हे अफलातून किरण भावसार यांनी मांडले आहे.एक ढगूला त्याला तहान लागते.मग दळणाऱ्या आजीने जात्यात ढग घातली.तीच पाण्याचे थेंब होऊन दळून निघाली.ढगुल्याची तहान भागली.'पळता भूई थोडी' जंगलाचा राजा सिंह एकदा गावाला जातो पण जंगलाचा राज्यकारभार कुणाच्या हाती सिंहासन सोपवत नाही.मग सारीच राजे होऊन स्वैर जंगलात धिंगाणा घालतात.जेंव्हा हे सिंह जंगलात येतो.तेंव्हा त्यांना पळती भुई थोडी होते.ही बालकथा मनोरंजन झाली आहे वाचताना मन खळखळून हसते.एकदा वाघाचे बच्चू आपल्या आई सोबत जंगलात फिरताना अचानक हरपते तेव्हा ते गाव वस्तीत येते.एक घराच्या दरवाजाच्या फिटीतून झोपलेल्या मुलाच्या बिछान्यावर जाऊन झोपते.सकाळी आईला आपल्या मुलाच्या बाजूला झोपलेलं वाघाचं पिल्लू पाहून त्याला आईचे प्रेम देते आणि जंगलात सोडून येते त्याची त्याला आई भेटते.'बछडं वाट चुकलं' अशा सुंदर आशय संपन्न कथा यात आहे.मम्मी पप्पा,ऑफिसला गेल्यावर,घरचं मुलांशी खेळायला येते.घर बोलते भिंती त्याच्या बरोबर बोलतात.ही मनस्वी आजच्या वास्तवाची कथा आहे.मुलंआई वडीलपासून दुरावत आहे.त्यांच्याशी मायाळू स्पर्शाची ओढचं राहिली नाही.अशी सुंदर कथा या संग्रहात आहे.आजी आजोबाचे भांडण कसे मिटले,घरात ट्रिंग ट्रिंग मोबाईल आला.मोठे महागडे हेडसेट आले.पण मुलांच्या मनावर एकलकोंडीपणा आला.त्याला मोबाईल मुळे नातं गोत आपुलकीचं मायेचं कुणीचं दिसत नाही.म्हणून हीमोबाईलचं वेड थांबले पाहिजे.तर आजीच चल रे भोपळ्या टुणकटणुक घ्या जागी आज न्यानो गाडीचा भोपळा घेऊन येणारी म्हातारी आजी या बालकथेत आहे.कवी बालकथाकार किरण भावसार खरोखरच बाल मानसशास्त्र दृष्टीने ही कथा समृद्ध झाली आहे.यातील बाल सृजन मनाला चित्र खूपचं आवडणारी आहेत.आजी आजोबांचे भांडण मिटवयाचे आहे.ते एकमेकांना कसे बोलतात.तर न्यानो गाडीत आजचा चल रे भोपळ्या टुणकटणुक ही चित्रे अतिशय अप्रतिम झाली आहे.यात एकूण सात कथा अतिशय सुंदर लहान मुलांच्या मनावर संस्कार करणाऱ्या बालकथा आशय संपन्न झाल्या आहेत. साहित्य अकादमी पुरस्कार विजेते डॉ सुरेश सावंत सरांनी पाठराखण लिहिली" संयम, मातृप्रेम, समंजसपणा, समजूतदारपणा इ.जीवनमूल्ये शिकवत बाळगोपाळांचे भावविश्व समृद्ध करणाऱ्या ह्या गोष्टी आहेत.निखळ आनंद देणाऱ्या ह्या गोष्टी बाळगोपाळांना आवडतील"संतोष गोळेगावकर यांचे मुखपृष्ठ व रेखाटने अतिशय उत्तम आहेत.प्रकाशक ज्ञानपथ पब्लिकेशन अमरावतीयाचे लक्षवेधक पुस्तक झाले आहे.किरण भावसार सिन्नर यांच्या या बालकथेला अत्यंत महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त झाले आहे.



**पुस्तकाचे नांव:-एक होता ढगुला (बालकथसंग्रह)**
**लेखक:-किरण भावसार, सिन्नर**
**प्रकाशक:-ज्ञानपथ पब्लिकेशन,अमरावती**
**मुखपृष्ठ:-संतोष गोळेगावकर**
**प्रथमावृती:-१४नोव्हेंबर १०२५ (बालदिन)**
**किंमत:- १५० रूपये/**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

# बीड जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराज 'स्व' समापन शिबिर अभियान राबविणार



**बीड (भगवंत पाळवदे)** : बीड जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळांमध्ये महसूल सेवा अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आणि नागरिकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी बीड जिल्हा प्रशासनामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समापन शिबिर अभियान – टप्पा 2 राबविण्यात येणार आहे. बीडचे जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन (भा.प्र.से.) यांनी दि. २६.०२.२०२६ रोजी सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार आणि महसूल मंडळाधिकारी व इतर विभागांच्या जिल्हास्तरीय आढावा बैठकीत हे अभियान १०० टक्के यशस्वी करण्याचे निर्देश दिले आहेत.हे अभियान 8 मार्च २०२६ ते 15 मे २०२६ या कालावधीत राबविले जाणार आहे. सामान्य जनता, शेतकरी, महिला आणि विद्यार्थी यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्न एकाच ठिकाणी निकाली काढणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. "एकाच दिवशी सेवा वितरण (Single Day Service Delivery)" या संकल्पनेवर हे अभियान आधारित असेल.या शिबिरांमध्ये नागरिकांना खालीलप्रमाणे महत्त्वाच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ✔ दाखले वाटप: विद्यार्थ्यांसाठी शाळा/कॉलेज प्रवेशासाठी आवश्यक दाखले दिले जातील. लोकसेवा हक्क कायद्यानुसार प्रलंबित अर्ज निकाली काढून तसेच पूर्वी प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने प्राप्त वितरण करणे. ✔ 7/12 अद्ययावत करणे: प्रलंबित व विवादास्पद फेरफार निकाली काढणे, जिवंत 6/12, मोहीमांतर्गत अद्ययावत 7/12 चे वाटप आणि फेरफार नोंदी दुरुस्त केल्या जातील. ✔ जमिनी संबंधित प्रकरणे: भोगवटादार वर्ग-1 जमीन वर्ग-2 मध्ये परावर्तित करणे, अकृषिक सुधारणा कायद्यानुसार गरजीनुसार करणे, तुकडेबंदी कायद्यान्वये फेरफार आणि अकृषिक (NA) परवानी नोंदी अद्ययावत केल्या जातील. ✔ सामाजिक अर्थसहाय्य: विविध शासकीय योजनांच्या पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेशांचे वाटप करण्यात येईल. ✔ डिजिटल 7/12: महाभूमी पोर्टलवरील QR Code डिजिटल 7/12 ला पूर्ण कार्यान्वित ठेवत असल्याबाबत जनजागृती करणे. ✔ कमी-जास्त पत्रके: भूसंपादन व अकृषिक परवानी दिलेल्या प्रकरणांत 'कमी-जास्त पत्रके' तयार करून गाव नमुने अद्ययावत करणे बाबत शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल. ✔ इतर सेवा: Ease of Doing Business सुधारणा व नागरी सुविधा, समाधान शिबिरामध्ये एक खिडकी सुविधा अंतर्गत आधार नोंदणी दुरुस्ती, ई-नामजारी, अंशांक, पी.एम. किसान व तक्रार निवारण कक्ष (जनता दरबार).18 फेब्रुवारी ते 5 मार्च या कालावधीत अभियानाची पूर्वतयारी करण्यात येत आहे. यामध्ये संभाव्य लाभार्थ्यांची यादी तयार करणे, लोकप्रतिनिधींशी संवाद साधणे आणि गावोगावी दवंडी व सोशल मीडियाद्वारे जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.करिता छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समापन शिबिर अभियानांतर्गत वरीलप्रमाणे देण्यात येणाऱ्या सर्व सेवांचा लाभ बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी, शेतकरी आणि विद्यार्थ्यांनी आपल्या जवळच्या महसूल मंडळ स्तरावरील शिबिराची माहिती घेऊन या अभियानाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन मा. विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी बीड, यांनी केले आहे.